# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (शिक्षण विभाग)

क्र.3329/शि.वि./2014 दि. 30/10/2014

**प्रति,**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापीका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :– शिष्यवृत्ती परीक्षा 2015 करीता विद्यार्थ्यांचे ऑन लाईन अर्ज भरण्याबाबत.**
**संदर्भ :– कार्यालयीन पत्र क्र.3122/शि.वि./2014 दि. 25.08.2014.**

उपरोक्त विषयांकित पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य परीक्षा, परिषद, पूणे यांच्यामार्फत दरवर्षी मार्च महिन्यात इयत्ता 4 थी व 7 वी करीता शिष्यवृत्ती परीक्षा आयोजित केली जाते. दरवर्षी आपल्या शाळेतील विद्यार्थी या परीक्षेला बसत असतात. चालू सत्रात सदर परीक्षेकरीता **www.mscepune.in** या वेबसाईडवर ऑनलाईन आवेदन पत्र सादर करावयाचे आहे. ऑन लाईन अर्ज भरण्याची प्रक्रीया सुरु झाली असून याकरीता आपल्या शाळेतील इयत्ता 4 थी व इयत्ता 7 वी विद्यार्थ्यांची माहिती गोळा करून सदर ऑन लाईन अर्ज भरण्यास्तव खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

1) परीक्षा परिषदेच्या **www.mscepune.in** या संकेतस्थळावर भेट देणे.
2) संकेतस्थळाच्या होमपेजवर (Home page) वरील MSS/HSS शिष्यवृत्ती ऑनलाईन अर्ज या बटनावर Click करून शिष्यवृत्ती परीक्षेच्या पेजवर जाणे.
3) शिष्यवृत्ती परीक्षेच्या पेजवरील सर्व साधारण सूचना, शाळा माहिती प्रपत्र भरण्याच्या मुद्देनिहाय सूचना, 4 थी/7 वी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदन भरण्याबाबत मुद्देनिहाय सूचना, या परीक्षंची माहिती पत्रके, परीपत्रके, शासन निर्णय इत्यादींचे बारकाईने वाचन करणे व त्याची प्रिंट आऊट काढणे.
4) शाळा माहिती प्रपत्र (School Profile) भरणे. हि माहिती भरण्याकरीता UDISE संकेतांक 11 अंकी बरोबर असल्याची खात्री करा. यावरील माहिती भरण्याकरीता आवेदन पत्राचे नमूने प्रिंट करून माहितीचा अभ्यास करावा. तसेच या पेजवरील शाळा माहिती प्रपत्र (School Profile) व आवेदन पत्र भरण्याचा सराव करावा.
5) शाळा माहिती प्रपत्र भरल्यानंतर त्यातील मुद्देनिहाय माहिती अचूक असल्याची खात्री करा Save बटनावर Click करा. आवश्यक ती सर्व माहिती भरल्यानंतर ती अचूक असल्याची खात्री झाल्यानंतरच Confirm बटनावर Click करा.
6) Confirm बटनावर क्लीक केल्यानंतर शाळा माहिती प्रपत्रात कोणताही बदल करता येणार नाही.
7) शाळा माहिती प्रपत्र भरल्याशिवाय आणि Confirm बटनावर Click केल्याशिवाय 4 थी/7वी शिष्यवृत्ती परीक्षेची ऑनलाईन आवेदन पत्र भरता येणार नाहीत. तसेच सिस्टीमव्दारा स्वीकारल्या जाणार नाही.
8) परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती संकलित करून ठेवावी.या पेजवरील कृती ओघ तक्त्याच्या (Flow Chart) मदतीने आवेदन पत्र भरण्याच्या प्रक्रीयेचे अवलोकन करावे.
9) आवेदन पत्र भरण्यासाठी परीक्षा परिषदेकडून शाळेस मुख्याध्यापकांच्या मोबाईल वर SMS व्दारे Login ID व Password देण्यात येईल. परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावरील Home Page वर असलेल्या School Information Gateway (SIG) मधील प्रपत्रात नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर हा SMS पाठविण्यात येईल.

10) User ID व Password न मिळाल्यास परिषदेच्या संकेतस्थळावरील Home Page वरील School Information Gateway (SIG) मधील Fill Form बटनावर Click करून प्रपत्र त्वरीत भरावे त्यामुळे User ID व Password देणे सुलभ होईल.

11) 1 नोव्हेंबर 2014 अखेरपर्यंत शाळेच्या मुख्याध्यापकांना आवेदन पत्र भरण्यासाठी SMS व्दारे Login ID व Password प्राप्त न झाल्यास या पेजवर दिलेल्या विहीत नमून्यातील भरलेला अर्ज प्रिंट करून त्यातील माहिती मुख्याध्यापकाचा शिक्का लावून भरावी. हा अर्ज Scan करून भरून Email पाठवावा. यासाठी या पेजवर दिलेल्या **mscepune@gmail.com** या Email ID चा वापर करावा व त्याचा पाठपुरावा करावा. Helpline क्रमांक 7774012455/7774012456 या क्रमांकावर सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत संपर्क साधावा.

12) सूचना व नमूना अर्जाचे अवलोकन केल्यानंतरही काही अडचण आल्यास या पेजवरील Helpline क्रमांक 7774012455/7774012456 या क्रमांकावर सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत संपर्क साधावा.

13) शाळा माहिती प्रपत्र Confirm झाल्यानंतर स्क्रीनवरील Home बटनावर Click करा.

14) त्यानंतर ज्या परीक्षेची आवेदन पत्रे भरावयाची आहे त्या परीक्षेच्या नावांवर किंवा परीक्षेच्या नावाखाली असलेल्या New Form बटनावर Click करा.

15) संकेतस्थळावरच्या सूचनांची काटेकोर अमंलबजावणी करावी.

16) ऑनलाईन आवेदन पत्रात शुल्क, परीक्षा शुल्क, एकूण शुल्क आपोआप गणले जावून संबंधित चौकटीत नोंदविले जाईल. सर्व विद्यार्थ्यांकरीता परीक्षा अर्ज फी 10/– असून परीक्षा फी SC,ST, VJ-A, NT-B NT-C, NT-D या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना नाही इतर उर्वरित प्रवर्गातील (SBC, OBC, ECBS, SBC-A, OPEN) विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क 50/– रू. भरावे लागेल. शाळा संलग्नता शुल्क 200/– रू. असून चालान शुल्क 20/– रू. राहील.

17) परीक्षेस बसणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे आवेदन पत्र (Form) अचूक भरून Save करावे.

18) सर्व विद्यार्थ्यांची आवेदन पत्रे भरल्यांनतर Show List या बटनावर Click करून आवेदन विद्यार्थ्यांची पडताळणी यादी (Check List) प्रिंट करणे.

19) Check List मध्ये त्रुटी/चूका असल्यास पुन्हा संबंधित विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्र उघडून दूरूस्ती करणे/सुधारणा करणे.

20) सर्व दुरुस्त्या झाल्यानंतरच ऑनलाईन चलनाची (SBI किंवा SBH ) प्रिंट घेणे.

21) चलनाव्दारे रक्कम SBI किंवा SBH बँकेत भरणे.

22) परिषदेच्या संकेतस्थळावर पुन्हा Login करून चलन Update करणे.

23) आवेदन भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी – प्रपत्र अ ( List of Applicant ) ची प्रिंट आऊट घेणे.

24) प्रपत्र अ ची छायांकिंत प्रत (Xerox) काढून विहीत रकान्यात परीक्षार्थी व पालकांची स्वाक्षरी घेणे, मुख्याध्यापकांनी शाळेचा शिक्का उमटवून स्वतःची स्वाक्षरी करणे. प्रपत्र अ ची छायांकिंत प्रत व चलनाची प्रत ( School Copy ) शाळेत कायमस्वरूपी जतन करून ठेवणे.

25) प्रपत्र अ ची मुळ प्रत, असल्यास प्रमाणपत्रे (विद्यार्थ्यांचे पालक भुमीहीन शेतमजूर असल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, पालकाचे उत्पन्न रू. 20,000/– (वीस हजार रूपये) पेक्षा कमी असल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र) आणि चलनाची प्रत (MSCE Copy ) याचे दोन संच (मुळ व एक झेरॉक्स प्रत) व हाताळणी शुल्क रू. 50/– दुर्गानगर समूह साधन केंद्र येथे जमा करावे.

26) ऑनलाईन अर्ज भरण्याची कार्यवाही त्वरीत सुरू करावी. ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतच्या शेवटच्या तारखेची माहिती संकेतस्थळावरून घ्यावी. या नंतर विलंब शुल्क सर्व विद्यार्थ्यांकरीता 50/– रू. राहील याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर